उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेल्या निर्देशानुसार ग्राम विकास व जलसंधारण विभाग (खुद्द) मधील पदे निरसित करुन विभागाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करणेबाबत व विभागाच्या जलसंधारण उप विभागातील पदे नव्याने निर्माण झालेल्या मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदनि-१०१६/प्र.क्र.१७८/आस्था-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १९ मार्च, २०१८

संदर्भ :-

१. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/९४/बारा, दि. ७ मार्च, १९९६,
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र-असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, १० सप्टेंबर, २००१,
३. ग्रा.वि. व ज.सं.विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि-१५०१/प्र.क्र.७९८/आस्था-१, दि.८ ऑक्टोबर, २००२,
४. वित्त विभाग,शासन निर्णय क्र-असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०४ ऑक्टोबर,२००४,
५. वित्त विभाग, शासन निर्णय क्र-पदनि-२०१५/प्र.क्र.५/१५/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१५,
६. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दि.११ फेब्रुवारी, २०१६,
७. जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्र.आस्थाप-२०१६/प्र.क्र.८८ (भाग-९)/जल-२, दि. ३१ मे,२०१७,
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र-पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, २९ जून, २०१७,
९. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.शाकानि-२०१७/प्र.क्र.१२०/१८ (र.व का.), दि. २६ सप्टेंबर, २०१७,
१०. वित्त विभाग, पत्र क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.६५/आपुक, दि.०७ नोव्हेंबर, २०१७.

प्रस्तावना -

वित्त विभागाच्या दि.११ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, शासनाच्या कार्यपद्धतीतील तंत्रज्ञानाचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मनुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता, खर्चावर नियंत्रण ठेवणे, एकंदरीतच वित्तीय स्थैर्यासाठी वेतनावरील एकूण खर्च नियंत्रित करणे या बाबींचा विचार करुन, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील पदांचा आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांनी उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यानुसार ग्राम विकास व जलसंधारण विभाग (खुद्द) मधील पदांच्या आढाव्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर दिनांक २६ ऑक्टोंबर, २०१७ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या

बैठकीत ग्राम विकास व जलसंधारण (खुद्द) विभागाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे व्यपगत करुन, उर्वरित पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ९ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने ग्रामविकास व जलसंधारण विभाग (खुद्द) मधील मंजूर पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याची बाब विचाराधीन आहे.

२. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र. शाकानि-२०१७/प्र.क्र.१२०/१८(र.व का.), दि.२६ सप्टेंबर, २०१७-महाराष्ट्र शासन कार्यनियमावली (तिसरी सुधारणा) नियम, २०१७ अन्वये, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील शासन विभाग या शीर्षाखाली अ.क्र.१२- "ग्रामविकास विभाग" व अ.क्र.३३- "मृद व जलसंधारण विभाग" असे दोन स्वतंत्र विभाग अस्तित्वात आले आहेत. मृद व जलसंधारण विभागासाठी शासन निर्णय क्र. आस्थाप-२०१६/प्र.क्र.८८(भाग-९)/जल-२, दिनांक ३१ मे, २०१७ अन्वये, विभागाच्या (खुद्द) आस्थापनेवर ३५ पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्याव्यतिरिक्त ग्रामविकास व जलसंधारण विभाग या मूळ विभागातील जलसंधारण उप विभागासाठी कार्यरत असलेली पदे नव्याने निर्माण झालेल्या मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

उपरोक्त नमूद केलेली वस्तूस्थिती लक्षात घेऊन मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सुधारित आकृतिबंधासंदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

अ) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील ४०४ पदांपैकी रिक्त असलेली ८६ पदे निरसित करण्यात येत आहेत व प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेली विविध संवर्गातील एकूण ३१८ पदे पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

ब) प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या एकूण ३१८ पदांचे ग्रामविकास उप विभाग व जलसंधारण उपविभागात वाटप करावयाची पदे प्रपत्र "ब" मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

क) त्यापैकी प्रपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे जलसंधारण उप विभागात मंजूर असलेली ७३ पदे, नव्याने निर्माण झालेल्या "मृद व जलसंधारण विभाग" यांस हस्तांतरीत करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने संबंधित कार्यासने व अधिकारी/कर्मचारी मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरित करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

२. ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे विभाजन होऊन "ग्रामविकास विभाग " व "मृद व जलसंधारण विभाग" असे दोन स्वतंत्र विभाग झाल्यामुळे प्रपत्र- "अ" मध्ये नमूद केलेल्या एकूण मंजूर ३१८ पदांपैकी प्रपत्र "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामविकास विभागास २४५ पदे मंजूर आहेत व मृद व जलसंधारण विभागास ७३ पदे हस्तांतरीत करण्यात येत आहेत. त्यामुळे मृद व जलसंधारण विभागासाठी सदर ७३ पदे व दिनांक ३१ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार नव्याने निर्माण केलेली ३५ पदे अशी एकूण १०८ पदे मंजूर आहेत. ग्रामविकास विभाग व मृद व जलसंधारण विभागात सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यासनांमधील पदांमध्ये आवश्यक फेरफार करुन कार्यासनांची पुनर्रचना करण्यात येईल. तसेच सदर पुनर्रचनेत मृद व जलसंधारण विभागासाठी आस्थापना शाखा, रोख शाखा व नोंदणी शाखा इत्यादी नव्याने निर्माण करण्याची कार्यवाही मृद व जलसंधारण विभागाकडून स्वतंत्रपणे करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार व वित्त विभागाचे पत्र क्रमांक पदनि-२०१७/प्र.क्र.६५/१७/आ.पु.क., दि.०७ नोव्हेंबर, २०१७ अन्वये तसेच वित्त विभाग अनौसं-१६८/सग्रावि, दि.०६ जानेवारी, २०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१२०६३१९७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Nathlya Valvi

Digitally signed by Prakash Nathlya Valvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=37e23389b57a9e7ec7b19b76a580789713f16034880d23f1579f9f010c94459d, cn=Prakash Nathlya Valvi
Date: 2018.03.19 17:14:47 +05'30'

(प्र.ना.वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुंख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (ग्रामविकास), ग्रामविकास विभाग यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री, (मृद व जलसंधारण), मृद व जलसंधारण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री, (ग्रामविकास), ग्रामविकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री, (मृद व जलसंधारण), मृद व जलसंधारण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा.विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई,
१०. मा.विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई,
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक , मंत्रालय ,मुंबई,
१२. सचिव (ग्रा.वि. व पं.रा.), यांचे स्वीय सहाय्यक, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. सचिव (मृ. व ज.सं.वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. प्रधान सचिव (र. व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ साचिवालय, मुंबई (पत्राने),
१९. सह/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/१४,१४-अ,१४-ब, मंत्रालय मुंबई,
२०. सह/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/१८, मंत्रालय,मुंबई,

२१. सचिव (मु.मं.ग्रा.स.यो) यांचे स्वीय सहाय्यक, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई,
२२. आकृतीबंध पुनर्रचना कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
२४. मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने),
२५. मा.राज्य निवडणुक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने),
२६. मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने),
२७. मा.मुख्य सेवा हमी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पत्राने)
२८. अधिक्षक, मा.उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
२९. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई(पत्राने),
३०. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
३१. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई,
३२. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई,
३३. सह संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई,
३४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,
३५. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य,
३६. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य,
३७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
३८. सर्व अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय तसेच बांधकाम भवन, मुंबई,
३९. सर्व अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
४०. कक्ष अधिकारी (रोख शाखा), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
४१. कक्ष अधिकारी (रोख शाखा), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
४२. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई,
४३. ग्रामविकास विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय/बांधकाम भवन, मुंबई
४४. जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई
४५. निवडनस्ती/हजेरीपट लिपिक, आस्था-१, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रपत्र "अ"

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक-पदनि-१०१६/प्र.क्र.१७८/आस्था-१, दि.१९ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र

उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार ग्रामविकास व जलसंधारण (खुद्द) विभागातील अनिवार्य ठरलेल्या मंजूर पदांचा तपशिल.

क्र.	पदनाम	मंजूर पदे	सध्या कार्यरत पदे	रिक्त पदे	वित्त विभागाने प्रस्तावित केलेली पदे
१.	सचिव	२	२	०	२
२.	सह/उप सचिव/सह संचालक तथा उप सचिव	१०	९	१	१०
३.	अवर सचिव + सादरकर्ता अधिकारी	१५+१	१५+०	१	१५
४.	विधी अधिकारी तथा अवर सचिव	१	१	०	१
५.	सह संचालक (आर्थिक सेवा)	१	०	१	०
६.	लेखा अधिकारी (वर्ग-१)	१	१	०	१
७.	उप संचालक अर्थ व सांख्यिकी (ए.ग्रा.वि.कक्ष)	१	१	०	१
८.	कार्यकारी अभियंता व अवर सचिव	२	२	०	२
९.	उप संचालक (सांख्यिकी सेवा)	१	०	०	०
१०.	उप संचालक लेखा (वरिष्ठ लेखाधिकारी)	१	१	०	१
११.	कनिष्ठ लेखा अधिकारी	२	२	०	२
१२.	संशोधन अधिकारी (ए.ग्रा.वि.कक्ष)	१	१	०	१
१३.	कक्ष अधिकारी	४६	३९	७	३९
१४.	निवडश्रेणी लघुलेखक	३	२	१	२
१५.	उप अभियंता	२	१	१	१
१६.	सहायक कक्ष अधिकारी / रोख लेखापाल	९४	८२	१२	८२
१७.	सहाय्यक लेखा अधिकारी	२	२	०	२
१८.	संशोधन सहाय्यक (ए.ग्रा.वि.कक्ष)	३	२	१	२
१९.	लघुलेखक (उच्चश्रेणी)	१४	१३	१	१३
२०.	लघुलेखक (निम्नश्रेणी)	१८	८	१०	८
२१.	मुख्य टंकलेखिका/टंकलेखक	३	१	२	१
२२.	लघुटंकलेखक	४	३	१	३
२३.	लिपिक-टंकलेखक / रोखपाल / देयक लेखापाल इ.	१२५	८४	४१	८४
२४.	वाहनचालक	८	५	३	५
२५.	हवालदार	१	१	०	१
२६.	नाईक	३	३	०	३
२७.	आवेष्टक	२	१	१	१
२८.	चक्रमुद्रक	२	१	१	१
२९.	शिपाई	३५	३४	१	३४
	एकूण	**४०४**	**३१७**	**८६**	**३१८**

प्रपत्र "ब"

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक.पदनि-१०१६/प्र.क्र.१७८/आस्था-१, दि. १९ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र

सुधारित आकृतीबंधानुसार ग्रामविकास व जलसंधारण विभागातील मंजूर पदांचे वाटप

क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	एकूण	सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदांचे वाटप	
				ग्राम विकास	जलसंधारण
भा.प्र.से.(सवंर्ग)					
१.	सचिव	(३७४००-६७०००) ग्रेड वेतन १००००	२	१	१
गट-अ राजपत्रित					
२.	सह सचिव	(३७४००-६७०००) ग्रेड वेतन ८७००	२	१	१
३.	उप सचिव	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ७६००	७	६	१
४.	सह संचालक व उप सचिव (लेखा)	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ७६००	१	१	--
५.	अवर सचिव	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ६६००	१५	१२	३
६.	कार्यकारी अभियंता व अवर सचिव	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ६६००	२	--	२
७.	अवर सचिव (विधी)	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ६६००	१	१	०
८.	उप संचालक (वित्त व लेखा) (वरिष्ठ लेखा अधिकारी)	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ६६००	१	१	--
९.	उप संचालक (अर्थ व सांख्यिकी (ए.ग्रा.वि.कक्ष)	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ५४००	१	१	--
१०.	उप अभियंता	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ५४००	१	--	१
११.	लेखा अधिकारी-वर्ग-१	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन ५४००	१	--	१
		गट-अ एकूण	**३४**	**२४**	**१०**
गट-ब राजपत्रित व अराजपत्रित					
१२.	कक्ष अधिकारी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४८००	३९	२८	११
१३.	निवडश्रेणी लघुलेखक	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४६००	२	१	१
१४.	लेखा अधिकारी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४६००	२	२	--
१५.	सहायक लेखाअधिकारी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४४००	२	१	१
१६.	संशोधन अधिकारी (ए.ग्रा.वि.कक्ष)	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४४००	१	१	--
१७.	लघुलेखक उच्चश्रेणी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४४००	१३	१०	३
१८.	सहायक कक्ष अधिकारी / रोखलेखापाल	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४३००	८२	६४	१८
		गट-ब एकूण	**१४१**	**१०७**	**३४**
गट-क					
१९.	संशोधन सहायक (ए.ग्रा.वि.कक्ष)	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४३००	२	२	--
२०.	लघुलेखक निम्नश्रेणी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४३००	८	६	२
२१.	लघुटंकलेखक	(५२००-२०२००) ग्रेड वेतन २४००	३	३	०
२२.	लिपिक-टंकलेखक / देयक लेखापाल	(५२००-२०२००) ग्रेड वेतन १९००	८४	६५	१९
२३.	टंकलेखक	(५२००-२०२००) ग्रेड वेतन १९००	१	१	०
२४.	वाहनचालक	(५२००-२०२००) ग्रेड वेतन १९००	५	४	१
		गट-क एकूण	**१०३**	**८१**	**२२**
गट-ड					
२५.	हवालदार	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १६००	१	१	--
२६.	नाईक	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १६००	३	२	१
२७.	आवेष्टक	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १६००	१	१	--
२८.	चक्रमुद्रक	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १६००	१	१	--
२९.	शिपाई	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १३००	३४	२८	६
		गट-ड एकूण	**४०**	**३३**	**७**
		एकूण	**३१८**	**२४५**	**७३**

प्रपत्र "क"

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक पदनि-१०१६/प्र.क्र.१७८/आस्था-१, दि.१९ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र

मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्यात येत असलेली पदे

क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्यात येत असलेली पदे
भा.प्र.से. (संवर्ग)			
१.	सचिव	(३७४००-६७०००) ग्रेड वेतन १००००	१
गट-अ राजपत्रित			
२.	सह सचिव	(३७४००-६७०००) ग्रेड वेतन-८७००	१
३.	उप सचिव	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन - ७६००	१
४.	अवर सचिव	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन - ६६००	३
५.	कार्यकारी अभियंता व अवर सचिव	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन - ६६००	२
६.	उप अभियंता	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन - ५४००	१
७.	लेखा अधिकारी वर्ग-१	(१५६००-३९१००) ग्रेड वेतन - ५४००	१
		गट-अ एकूण	**१०**
गट-ब राजपत्रित व अराजपत्रित			
८.	कक्ष अधिकारी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४८००	११
९.	निवडश्रेणी लघुलेखक	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४६००	१
१०.	सहायक लेखाअधिकारी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४४००	१
११.	लघुलेखक उच्चश्रेणी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४४००	३
१२.	सहायक कक्ष अधिकारी / रोख लेखापाल	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४३००	१८
		गट-ब एकूण	**३४**
१३.	लघुलेखक निम्नश्रेणी	(९३००-३४८००) ग्रेड वेतन ४३००	२
१४.	लिपिक-टंकलेखक / देयक लेखापाल	(५२००-२०२००) ग्रेड वेतन १९००	१९
१५.	वाहनचालक	(५२००-२०२००) ग्रेड वेतन १९००	१
		गट-क एकूण	**२२**
गट-ड			
१६.	नाईक	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १६००	१
१७.	शिपाई	(४४४०-७४४०) ग्रेड वेतन १३००	६
		गट-ड एकूण	**७**
		एकूण	**७३**